महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-440001
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांकः नाविमं/पमा/185
नागपूर, दिनांक :– 14/01/2025

प्रति,
मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

विषयः– फेब्रुवारी–मार्च 2025 मधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षेस प्रविष्ट होणा–या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भः– 1. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण–2016/प्र.क्र. 202/एस.डी. 2, दि. 24/11/2017.
2. राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र कमांक रा.मं./परीक्षा–7/153 दि. 14/01/2025.

महोदय,

आपणास सविनय सादर करण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणा–या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. 05 मध्ये याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळेकडे दि. 15 डिसेंबर अखेर व माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख 15 जानेवारी अशी नमूद आहे.

तथापि शासकीय रेखाकला एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परिक्षा 2024 चा निकाल जानेवारी 2025 च्या दुस–या आठवडयात जाहीर करण्यात येणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव स्विकारण्याच्या मुदतीमध्ये वाढ करण्याबाबत सदर प्रस्ताव स्विकारण्याच्या दोन्ही तारखांना खालीलप्रमाणे मुदतवाढ या वर्षासाठीच देण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह सुधारित अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे | दिनांक 15 डिसेंबर | शुक्रवार, दि. 24 जानेवारी 2025 |
| 2 | शाळांनी विभागीय मंळडाकडे प्रस्ताव सादर करणे | दिनांक 15 जानेवारी | शुक्रवार, दि. 31 जानेवारी 2025 |

सर्व मुख्यध्यापकांना कळविण्यात येते की सदर बाब ही विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता ध्यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

प्रतिलिपीः–

1) सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3 शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांना लेखी निदर्शनास आणून द्यावे.
4) मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै..........................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.